महाराष्ट्र विधानसभा

पहिले अधिवेशन, २०१९

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

नाशिक जिल्हयातील आदिवासी समाजातील मुलांच्या शिष्यवृत्ती वाटपामध्ये झालेला गैरव्यवहार

(१) ३४३३२ (२२-११-२०१५). श्री.बाळासाहेब सानप (नाशिक पूर्व) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयातील आदिवासी समाजातील मुलांच्या शिष्यवृत्ती वाटपामध्ये ११ कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ च्या दुसऱ्या आठवडयात उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी मुलांच्या शिष्यवृत्तीचा पैसा हा पात्र विद्यार्थ्यांना न देता चुकीच्या संस्थाना देण्यात आला असल्याचे आदीवासी विकास आयुक्तांच्या नेमलेल्या चौकशी समिती मध्ये उघड झाले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करून गैरव्यवहार झालेली रक्कम शासन जमा करणे व चौकशीत दोषी आढळलेल्यां विरूध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा (१३-०८-२०१८) : (१) व (२) हे खरे नाही. नाशिक जिल्हयातील नाशिक व कळवण या प्रकल्पाअंतर्गत भारत सरकार शिष्यवृत्तीमध्ये गैरव्यवहार झाल्याचे आढळून आलेले नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

अहमदनगर (ता.श्रीरामपूर) जिल्ह्यातील आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीचे ऑनलाईन पोर्टलवर अर्ज स्विकारले जात नसल्याबाबत

(२) ३४४५९ (२३-११-२०१५). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर (ता.श्रीरामपूर) जिल्ह्यातील आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीसाठी अर्ज करण्याची दिनांक ३० सप्टेंबर, २०१५ पर्यंतची अंतिम मुदत असताना शासनाने सुरु केलेल्या ऑनलाईन पोर्टलवर अर्ज स्विकारले जात नसल्याने इयत्ता २ री ते ८ वी शिक्षण घेणाऱ्या हजारो विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी वंचित राहवे लागणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(३) तसेच आदिवासी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा (१३-०८-२०१८) : (१) व (२) हे खरे नाही. शिष्यवृत्ती अर्ज भरण्याची ऑनलाईन प्रक्रिया सुरु आहे.

(३) सन २०१५-१६ पासून सुवर्ण महोत्सवी पुर्व माध्यमिक शिष्यवृत्ती या योजनेची शिष्यवृत्ती फॉर्म भरुन घेण्याची प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने सुरु असून त्यानुसार पात्र लाभार्थ्यांना शिष्यवृत्ती वाटपाची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील आदिवासींना विविध योजनांच्या अंमलबजावणीकरिता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

(३) ३९४१६ (१४-१०-२०१५). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी उपाययोजनेला, केंद्राकडून मिळणारे विशेष सहाय्य घटनेतील कलम २७५(१) अन्वये, राज्यातील आदिवासींना विविध योजनांतर्गत मिळणारा निधी, तसेच आदिवासी मुलांच्या शिक्षणासाठी केंद्राकडून केल्या जाणा-या तरतुदींना सलग दुस-या वर्षी कपात करण्यात आली असल्याने, आदिवासींसाठी राबविण्यात येणाऱ्या तीन प्रमुख योजना (१) आदिवासी उपययोजनेसाठी रुपये १६०० कोटीची आवश्यकता असताना रुपये १२८० कोटी देण्यात आले, आदिवासींना केंद्राकडून १७०० कोटीची आवश्यकता असताना १३६७ कोटीची तरतूद करण्यात आली तर आदिवासी मुलांच्या शिक्षणासाठी रुपये १४३३.५७ कोटी गरज असतान प्रत्यक्षात रुपये ११५४.८४ कोटी देण्यात आल्याने आदिवासींच्या योजनांची अंमलबजावणी करण्यास अडचणी येणार आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने अधिक निधी प्राप्त करुन घेण्याच्या दृष्टीने कोणते प्रयत्न केले वा करण्यात येत आहेत,
(३) आदिवासी योजनांच्या अंमलबजावणीकरिता पुरेसा निधी उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा (२८-०३-२०१९) : (१) हे खरे नाही.
सन २०१५-१६ या वर्षात विशेष केंद्रीय सहाय्य, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २७५(१) व भारत सरकार मॅट्रीकेत्तर शिष्यवृत्ती या योजनांसाठी प्रस्तावित निधी व मंजूर निधी याची माहिती पुढील प्रमाणे आहे.

(रु.कोटीत)

अ.क्र.	योजनेचे नाव	केंद्र शासनाकडे प्रस्तावित केलेला निधी	केंद्र शासनाने मंजूर केलेला निधी
१.	विशेष केंद्रिय सहाय्य	१५०.००	१२५.१४
२.	भारतीय संविधानाचे अनुच्छेद २७५(१)	१४७.६५	१३३.७४
३.	भारत सरकार पोस्ट मॅट्रीक स्कॉलरशीप	१५५.४१	१४४.९५

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

चारगाव व ढवलापूर (ता.पारशिवनी, जि.नागपूर) या ग्रामीण क्षेत्रात आदिवासी विभागामार्फत आदिवासी महिलांसाठी स्वयंरोजगार उद्योग केद्रांची स्थापना करण्याबाबत

(४) ५८९०२ (१२-०९-२०१६). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चारगाव व ढवलापूर (ता.पारशिवनी, जि.नागपूर) या ग्रामीण क्षेत्रात आदिवासी विभागामार्फत आदिवासी महिलांसाठी स्वयंरोजगार उद्योग केद्रांची स्थापना करण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.आदिवासी विकास मंत्री यांना माहे मार्च, २०१६ च्या दुस-या आठवड्यात दिले, हे खरे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा (०७-०३-२०१६) : (१) होय, हे खरे आहे.

(२) प्रकल्प अधिकारी, नागपूर यांनी त्यांच्या दिनांक २६/११/२०१६ च्या पत्रान्वये महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, नागपूर यांना सविस्तर प्रस्ताव सादर करणेबाबत कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

शासकीय व अनुदानित (ता.जव्हार, जि.पालघर) येथील आश्रमशाळेत एका वर्गात क्षमतेपेक्षा अधिक विद्यार्थांना प्रवेश दिल्याबाबत

(५) ६६९५९ (२७-०१-२०१७). श्री.अमित घोडा (पालघर) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार (जि.पालघर) तालुक्यात अनेक शासकीय व अनुदानित आश्रमशाळेत एका वर्गात क्षमतेपेक्षा अधिक विद्यार्थी असल्यामुळे शाळेतील विद्यार्थ्यांना ८ वी पास झाल्यानंतर ९ वी मध्ये प्रवेश मिळणे दुरापास्त झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विनाअनुदानित व अनुदानित आश्रमशाळा विद्यार्थ्यांना ९ वी त प्रवेश देऊ शकत नसल्यामुळे प्रवेश न मिळाल्यामुळे मुलांनी शिक्षण सोडून मोलमजूरीकडे वळावे लागत आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शिक्षण विभागाने १० वी पर्यंतच्या तुकडया वाढवून घ्याव्यात तसेच काही शाळांना नव्याने वर्ग सुरु करण्याची अनुमती द्यावी, अशी पालक व विद्यार्थी यांनी आदिवासी विकास कार्यालय, जव्हार यांच्याकडे सन २००२ पासून सतत मागणी करुनही अजूनपर्यंत कोणतीही कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा गंभीर प्रश्न पाहता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा (२८-०२-२०१९) : (१), (२) व (३) हे खरे नाही.

प्रकल्प अधिकारी, जव्हार, जि.पालघर अंतर्गत जव्हार तालुक्याअंतर्गत ३० शासकीय आश्रमशाळा व १७ अनुदानित आश्रमशाळा कार्यरत आहेत. सन २०१६-१७ मध्ये ३० शासकीय आश्रमशाळेत १७३९९ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आलेला आहे. तसेच अनुदानित आश्रमशाळेत १२००९ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आलेला आहे. त्यामध्ये शासकीय आश्रमशाळेतील इयत्ता ८वी मध्ये २१४७ इ.९ वी मध्ये २२०६ विद्यार्थ्यांना, तर अनुदानित आश्रमशाळेतील इयत्ता ८ वी मध्ये १३३५ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आलेला आहे. मागणी केल्याप्रमाणे विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आलेला असून कोणत्याही विद्यार्थ्यांस शिक्षणापासून वंचित ठेवण्यात आलेले नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

डोंगर कठोरा (ता.यावल, जि.जळगाव) येथील शासकीय आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या मागण्याबाबत

(६) ७१०६५ (२७-०१-२०१७). श्री.संजय सावकारे (भुसावळ) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंगर कठोरा (ता.यावल, जि.जळगाव) येथिल शासकीय आदिवासी आश्रमशाळेतील २९ विद्यार्थ्यांनी आपल्या विविध मागण्यांसाठी आश्रमशाळा ते प्रकल्प कार्यालय, यावल अंतर पायी प्रवास करुन प्रकल्प कार्यालयावर मोर्चा नेल्याची घटना दिनांक १९ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांच्या मागण्या मान्य करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा (२८-०२-२०१९) : (१) हे खरे आहे.

(२) इंग्रजी विषय शिक्षकाचे पद रिक्त असणे, विज्ञान विषयक तासिक नियमित न हाणे, विद्यार्थ्यांना गणवेश न मिळणे, जेवणाचा दर्जा व्यवस्थित नसणे या मागण्या विद्यार्थ्यांच्या होत्या. सदर मागण्यांच्या अनुसरुन, प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, यावल, जि.जळगांव यांनी शाळेस भेट देऊन सदर प्रकरणी चौकशी केली.

(३) प्रस्तुत प्रकरणी मुख्याध्यापक, शासकीय आदिवासी आश्रममाळा, डोंगरकठोरा यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे. तसेच, शासकीय आदिवासी आश्रमशाळा, डोंगरकठोरा येथे इंग्रजी शिक्षकाची नेमणूक करण्यात आली. विज्ञान विषय तासिक घेण्याबाबत सूचना करण्यांत आली आहे. विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करण्यात आलेले आहेत. जेवणाचा दर्जा सुधारण्याबाबत अधिक्षक, मुख्याध्यापक व वर्ग-४ कर्मचारी यांना आवश्यक त्या सूचना देण्यांत आल्या आहेत व सदर तक्रारी पुन्हा उद्भवू नयेत याबाबत सक्त ताकीद देण्यात आलेली आहे. त्यानंतर अशी बाब निदर्शनास आलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

पेनगंगानाग नदी (ता.रिसोड, जि.वाशिम) येथील बॅरेज परिसरात विजे संदर्भातील प्रस्तावाला मान्यता देणेबाबत

(७) ८२६९० (१९-०४-२०१७). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेनगंगानाग नदी (ता.रिसोड, जि.वाशिम) येथील बॅरेज परिसरात विजे संदर्भातील सुमारे रुपये १०० कोटीच्या प्रस्तावाला मान्यता देण्याबतची विनंती लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास मा.मंत्री यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार प्रस्तावास मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०५-०३-२०१९) : (१) हे खरे आहे.
(२) वाशिम जिल्हयातील पैनगंगा नदीवर उभारण्यात आलेल्या बॅरेजेसच्या परिसरात उपसा सिंचन करिता कृषीपंप ग्राहकांना विद्युत पुरवठा देण्याच्या दृष्टीने महावितरण कंपनीकडून रु.९५.८९ कोटींचा विस्तृत प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला असून त्यास शासन निर्णय दि.१४.०३.२०१७ अन्वये शासनाकडून मान्यता देण्यात आली आहे. त्यासाठी आवश्यक असलेला निधीपैकी रु.२५.०० कोटींचा निधी, महावितरणला प्राप्त झाला आहे. सदर कामाचा कार्यादेश कंत्राटदारास देण्यात आला असून कामे प्रगतीपथावर आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

आचरा भागातील (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) येथील सबस्टेशनचे काम अपूर्ण अवस्थेत असल्याबाबत

(८) ८६०६६ (०९-०८-२०१७). श्री.वैभव नाईक (कुडाळ) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालवण (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील आचरा भागातील विद्युत समस्या निवारण्यासाठी आचरा टेंमली येथील सर जोशी यांच्या जागेत उभारण्यात येणा-या सबस्टेशनचे सुरु असलेले काम महाराष्ट्र राज्य वीज वितरण मंडळाने बंद केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू काम बंद करण्याची कारणे काय आहेत,
(३) तसेच सदर सबस्टेशनचे काम सुरु करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व केलेल्या कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१३-०३-२०१९) : (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) ३३/११ केव्ही आचरा उपकेंद्र उभारणीचे काम पूर्ण करण्यात आलेले असून सदर उपकेंद्र दि.१४.१२.२०१७ रोजी कार्यान्वित करण्यात आले आहे.

मालवण तालुक्यातील (जि.सिंधुदुर्ग) वीज ग्राहकांना नवीन ट्रान्सफार्मर बसवून देण्याबाबत

(९) ८७१४३ (०९-०८-२०१७). श्री.वैभव नाईक (कुडाळ) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालवण (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील बांधीवडे, मळावाडी तसेच सय्यद जूआ या परिसरात होत असलेले भारनियमन व वीजेचा कमी भार यामुळे वीज ग्राहकांनी नवीन ट्रान्सफॉर्मर बसवून देण्याची मागणी गेल्या दोन वर्षांपासून वीज वितरण कंपनीच्या वरिष्ठ अधिका-यांकडे लेखी निवेदनाव्दारे केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वीज वितरण कंपनीच्या अधिका-यांनी सदर ट्रान्सफॉर्मरसाठी जागेची निश्चिती करुन सुध्दा आतापर्यंत ट्रान्सफार्मर न बसविण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, ग्रामस्थांच्या मागणीच्या अनुषंगाने किती कालावधीत ट्रान्सफार्मर बसविण्याची कार्यवाही पूर्ण करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१३-०३-२०१९) : (१), (२) व (३) मालवण तालुक्यातील (जि.सिंधुदुर्ग) बांदिवडे, मळवडे तसेच सय्यद जुवा या परिसरात २५ के.व्ही.ए. क्षमतेचे रोहित्र बसविण्यात आलेले होते. वाढती विजेची मागणी विचारात घेता सदर रोहित्राची क्षमता मे, २०१७ मध्ये २५ के.व्ही.ए. ऐवजी नवीन ६३ के.व्ही.ए. क्षमतेचे रोहित्र, पं. दिनदयाळ उपाध्याय ग्राम ज्योती योजनेअंतर्गत दिनांक १४.०७.२०१८ रोजी कार्यान्वित करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

नांदुरा शहरात (जि.बुलढाणा) १३२ के.व्ही. विद्युत उपकेंद्र उभारण्याबाबत

(१०) ८९११५ (०९-०८-२०१७). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मलकापूर मतदार संघातील नांदुरा शहरात (जि.बुलढाणा) १३२ के.व्ही. विद्युत उपकेंद्र नसल्यामुळे लघुउद्योग, पाणी पुरवठा योजना, ग्रामीण भागातील शेतीवरील कृषीपंप आदी सर्व बाबींना योग्य प्रकारचा उच्चदाब क्षमतेचा विद्युत पुरवठा होत नसल्याची बाब माहे जून, २०१७ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नांदुरा शहर हे राष्ट्रीय महामार्ग व रेल्वे महामार्गावर असूनही केवळ विद्युत उपकेंद्र नसल्यामुळे येथे औद्योगीकरणाचा अभाव आहे, हे हि खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर विद्युत उपकेंद्र उभारण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी वारंवार शासनाला सूचित केले असून याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१३-०३-२०१९) : (१) हे खरे आहे.

बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर विभागीय कार्यालयाअंतर्गत येत असलेल्या मोताळा, मलकापूर व नांदुरा तालुक्यातील अस्तित्वात असलेल्या ३३ के.व्ही/११ के.व्ही. उपकेंद्राला सद्यस्थितीत १३२ के.व्ही. मोताळा व १३२ के.व्ही. मलकापूर या अतिउच्चदाब उपकेंद्रातून ३३

के.व्ही वाहिनीद्वारे विद्युत पुरवठा करण्यात येत आहे. वीज मागणीमध्ये सतत होणाऱ्या वाढीमुळे १३२ के.व्ही अतिउच्चदाब उपकेंद्राची स्थापित क्षमता अपुरी पडत आहे. तसेच ३३ के.व्ही वाहिनीचे अंतर व त्या वाहिनीवरील असलेला वीज भार यामुळे (हंगामामध्ये) कमाल वीज मागणीच्या कालावधीत ३३ के.व्ही. उपकेंद्राला कमी दाबाचा वीज पुरवठा होतो.

(२) हे खरे नाही.

(३) मलकापूर येथील लोकप्रतिनिधीनी नायगाव येथे १३२ के.व्ही. उपकेंद्राची बाब विचाराधीन असून असे अति अतिउच्चदाब उपकेंद्र उभारण्यासाठी आवश्यक असलेल्या प्रस्तावाची तांत्रिक पडताळणी प्रक्रिया सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादितचे भालूर (ता.नांदगांव, जि.नाशिक) येथील ३३/११ केव्ही विद्युत उपकेंद्राचे काम प्रलंबित असल्याबाबत

(११) ९०९४१ (०९-०८-२०१७). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महावितरण कंपनीने भालूर (ता.नांदगांव, जि.नाशिक) येथे ३३/११ केव्ही विद्युत उपकेंद्रास मंजुरी दिलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास सदरचे विद्युत उपकेंद्राचे काम अनेक वर्षांपासून प्रलंबित असल्यामुळे भालूर व परिसरातील गावांमध्ये विजेची समस्या निर्माण झालेली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, काम प्रलंबित ठेवणा-या संबंधित ठेकेदार व अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच सदर काम तात्काळ सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०५-०३-२०१९) : (१) हे खरे आहे.

(२) सदर उपकेंद्र ०४ जून, २०१८ रोजी कार्यान्वित करण्यात आले आहे. तेव्हापासून भालूर व परिसरातील वीजपुरवठा सुरळीत झाल्यामुळे विजेची समस्या नाही

(३) ३३/११ के.व्ही.भालूर उपकेंद्राचे काम पायाभूत आराखडा २ योजनअंतर्गत, मे.ई.एम.सी.लि., जे.व्ही.श्रीनिवास इलेक्ट्रीक यांना माहे डिसेंबर, २०१३ मध्ये देण्यात आले होते. त्यांनी सदर कामात दिरंगाई केल्यामुळे त्यांच्यावर निविदेतील अटी व शर्तीनुसार दंडात्मक कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे. तद्नंतर सदर उपकेंद्राचे काम नाशिक परिमंडल स्तरावर समांतर निविदा काढण्यात येऊन उपकेंद्रासाठी लागणारे ३३ के.व्ही व ११ के.व्ही. वाहिनीचे काम पूर्ण करुन, सदर उपकेंद्र यशस्वीरित्या टेस्ट चार्ज करण्यात आल्यानंतर,३३/११ के.व्ही.भालूर उपकेंद्र, दि.०४.०६.२०१८ रोजी कार्यान्वित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

दहेगाव (ता.राळेगाव) येथे वादळी पावसामुळे वीजदाब वाहिनी व रोहित्राचे झालेले नुकसान

(१२) ९२६७४ (०९-०८-२०१७). डॉ.अशोक उईके (राळेगाव) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दहेगाव (ता.राळेगाव) येथे दिनांक २८ मे २०१७ रोजी झालेल्या वादळी पावसामध्ये विजेचे खांब व तारा काही ठिकाणी पडल्या असल्याने शेतीची कामे थांबली असल्याचे माहे, जून २०१७ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतक-यांनी विज वितरण कार्यालय, वडकी (ता.राळेगाव) येथे खांब उचलण्याबाबत लेखी तक्रार दिली परंतु अद्यापही कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत कार्यवाही न करण्याची कारणे काय आहेत तसेच विलंब करणा-या संबधित अधिकारी वा कर्मचारी यांचेवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०५-०३-२०१९) : (१) दिनांक २८ मे, २०१७ रोजी महावितरण कंपनीच्या यवतमाळ विभागाच्या कार्यक्षेत्रामध्ये प्रचंड प्रमाणात वादळी पाऊस झाल्यामुळे उच्च वीजदाब वाहीनी, लघु वीजदाब वाहीनी व रोहीत्राचे फार मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे.

(२) हे खरे नाही, वादळी पावसामुळे त्याच दिवशी दहेगाव शेत शिवारामध्ये दिगडोपोडे या रोहित्रावरील एकूण ८ ग्राहकांचा वीज पुरवठा खंडीत झाला होता. त्यापैकी ४ वीज ग्राहकांचा वीज पुरवठा दुसऱ्या रोहित्रावरुन सुरु करण्यात आला. उर्वरित ४ ग्राहकांच्या वीज वाहिनीचे दुरुस्तीचे काम पुर्ण करुन नोव्हेंबर २०१७ मध्ये वीज पुरवठा सुरळीत करण्यात आला आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

बदलापुर (जि.ठाणे) येथील महावितरणाच्या गैरकारभाराबाबत

(१३) ९६६४६ (२९-१२-२०१७). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बदलापूर (जि.ठाणे) येथील महावितरणाच्या गैरकारभाराचा त्रास सामान्य वीजग्राहकांसोबत नवीन इमारत उभारणाऱ्या विकासकांनाही होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बदलापूर, मुरबाड, शहापूर आणि टिटवाळा भागात १०० वीज ग्राहक मीटरच्या प्रतीक्षेत असून १५ हजार मीटर नादुरुस्त असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले, त्यानुसार ग्राहाकांना होणारा त्रास कमी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०५-०३-२०१९) : (१) हे खरे नाही.
(२) अंशत: खरे आहे. सद्यस्थितीत कल्याण ग्रामीण विभागात १०७७६ ग्राहक वीज जोडणीसाठी प्रलंबित असून अंदाजे ११८६० इतके सदोष अथवा नादुरुस्त मीटर आहेत.
(३) महावितरणच्या कल्याण ग्रामीण मंडळाअंतर्गत बदलापूर, शहापूर आणि टिटवाळा हे उपविभाग असून कल्याण ग्रामीण मंडळास एप्रिल, २०१७ ते मार्च, २०१८ अखेर ६५,२१५ एवढे सिंगल फेज मीटर्स व ३३१७ इतके थ्री फेज मीटर्स उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. माहे एप्रिल, २०१७ पासून बदलापूर, मुरबाड, शहापूर आणि टिटवाळा येथे एकूण सिंगल फेज ३६,८८४, थ्री फेज २१२७, टीओडी ९६६ मीटर्स नवीन कनेक्शनसाठी वापरण्यात आलेले आहेत. तसेच नादुरुस्त सिंगल फेज ५६,४८३ व नादुरुस्त थ्री फेज २१८० मीटर बदली करण्यात आलेले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

औरंगाबाद महसूल विभागात अनुसूचित जमातीची बनावट जात प्रमाणपत्रे देण्यात येत असल्याबाबत

(१४) ९८१८० (०१-०१-२०१८). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमर काळे (आर्वी) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद महसूल विभागात अनुसूचित जमातीची बनावट जात प्रमाणपत्रे देण्यात येणे, पडताळणी समितीकडून बनावट वैधता प्रमाणपत्रे देण्यात येणे इ. प्रकरणांची सखोल तपासणी करण्यासाठी विशेष तपासणी समिती गठीत करणे व शासन निर्णय दिनांक १ जुलै, २०१६ ची अंमलबजावणी या विभागातील सर्व जमातीसाठी करणेबाबत नांदेड येथील आदिवासी कोळी जेष्ठ नागरिक विकास परिषदेने विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी कार्यवाही केली नाही तर बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येईल असे निवेदनात नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, यात काय निदर्शनास आले, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा (२२-०२-२०१९) : (१) होय.
(२) होय.
(३) व (४) औरंगाबाद महसूल विभागात अनुसूचित जमातीची बनावट जात प्रमाणपत्रे देण्यात येणे, पडताळणी समितीकडून बनावट वैधता प्रमाणपत्र देण्यात येणे इ. प्रकरणांची सखोल चौकशी करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या विशेष तपासणी समितीने त्यांचा अहवाल ३० नोव्हेंबर, २०१८ रोजी शासनास सादर केला असून सदर अहवाल शासनाच्या विचारार्थ सादर करण्यात आलेला आहे.

महावितरण कंपनीच्या अभय योजनेंतर्गत लाभाध्यार्थांना मिटर जोडणी न मिळाल्याबाबत

(१५) १०२०४१ (०१-०१-२०१८). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महावितरण कंपनीमार्फत राबविण्यात येत असलेल्या अभय योजनेतंर्गत घरगुती नविन मिटर जोडणी हवी असल्यास अर्जासोबत मुळ थकीत रक्कम अर्जदारांकडून घेतली जात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजनेतंर्गत बुलढ़ाणा जिल्हयात माहे नोव्हेंबर, २०१६ पासून एकाही अर्जदाराला मिटर जोडणी देण्यात आली नसल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्यासुमारास निर्दशनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्याची कारणे काय आहेत तसेच या योजनेतंर्गत प्रतिक्षेत असलेल्या विदयुत धारकांना मिटर जोडणी देण्यासाठी शासनाने आजमितीस कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०५-०३-२०१९) : (१) हे खरे आहे.

कायमस्वरुपी वीज पुरवठा बंद (PD) असलेल्या ग्राहकांना अभय योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी मूळ थकीत रक्कमेचा भरणा करणे आवश्यक होते.

(२) हे खरे नाही.

अभय योजनेअंतर्गत माहे नोव्हेबर, २०१६ ते नोव्हेंबर, २०१७ या कालावधीत बुलढाणा जिल्हयातील एकूण २३१० घरगुती वीज जोडण्या देण्यात आलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही
(४) प्रश्न उद्भवत नाही.

चिखले गाव (ता.पनवेल, जि.रायगड) येथील वसतिगृहाच्या छताचे प्लास्टर कोसळून विद्यार्थी जखमी झाल्याबाबत

(१६) १०३५६९ (०६-०१-२०१८). श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नारायण कुचे (बदनापूर), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखले गांव (ता.पनवेल, जि.रायगड) येथील अनुदानित वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अंगावर छताचे प्लास्टर पडल्याची दुर्घटना माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू दुर्घटना विद्यार्थी रात्री झोपले असतांना घडली असल्याने शासनाने उक्त दुर्घटनेची चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, उक्त चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व चौकशीच्या अनुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच दुर्घटनेमध्ये जखमी झालेल्या विद्यार्थ्यांच्या उपचाराकरीता व वसतिगृहाच्या दुरुस्तीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा (०४-०४-२०१९) : (१) हे खरे आहे. प्रकल्प कार्यालय पेण अंतर्गत अनुदानित आश्रमशाळा, चिखले ता.पनवेल, जि.रायगड येथे इमारतीच्या स्लॅबचे प्लास्टर कोसळून ८ विद्यार्थी जखमी झाल्याची घटना घडलेली आहे.

(२) व (३) या प्रकरणाची प्रकल्प स्तरावर चौकशी करण्यात आली. सदर आश्रमशाळा ज्या इमारतीत आहे. ती २६ वर्ष जूनी असून सदर इमारतीची दुरुस्ती व स्ट्रक्चरल ऑडीट करण्यास संबधित संस्थेला कळविण्यात आले आहे.

(४) स्लॅबचे प्लास्टर कोसळण्याच्या दुर्घटनेत एकूण ८ विद्यार्थी जखमी झाले असून त्यापैकी ४ विद्यार्थी किरकोळ जखमी झाले होते. जखमी विद्यार्थ्यावर वेळीच वैद्यकिय उपचार करण्यात आले. जखमी विद्यार्थ्यांच्या प्रकृतीत सुधारणा झाली असून ते त्याच आश्रमशाळेत शिकत आहेत. विद्यार्थ्यांच्या वैद्यकीय उपचारावरील खर्चाची पूर्तता संबंधित संस्थेने केली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

बोरगाव (ता.तासगांव, जि.सांगली) येथील शेतकऱ्यांचा ऊस शॉर्टसर्कीट होऊन जळाल्याबाबत

(१७) १०८१०१ (१८-०४-२०१८). श्री.अनिल बाबर (खानापूर) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरगाव (ता.तासगांव, जि.सांगली) येथील तीन शेतक-यांचा सुमारे सहा एकर ऊस शॉर्टसर्कीट होऊन जळाल्याची घटना माहे डिसेंबर, २०१७ मध्ये घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वीजेचा दाब वाढून तारा एकमेकांना चिकटून शॉर्टसर्कीट होऊन ऊसाला आग लागून सुमारे १० ते १२ लाखांचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले, त्यानुसार उपरोक्त तीन शेतक-यांच्या झालेल्या नुकसानीची भरपाई देण्याबाबत तसेच संबधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१३-०३-२०१९) : (१) हे खरे आहे.

दिनांक २३.१२.२०१७ रोजी बोरगांव (ता.तासगांव, जि.सांगली) येथील चार शेतकरी यांचा एकूण ४.२५ एकर ऊस विद्युत कारणांमुळे जळीत झालेला आहे.
(२) विद्युत निरीक्षक, मिरज यांच्या अभिप्रायानुसार, सदरचा अपघात एल.टी. लाईनच्या बी फेज व न्युट्रल तार यांचा एकमेकाशी संपर्क होऊन स्पार्कींग होऊन ठिणगया पडल्याने झाला आहे. तथापि ऊस जळीताच्या नुकसानीबाबत सक्षम तालुका कृषी अधिकारी, ता. तासगांव, जि.सांगली यांचा मूल्यांकन अहवाल प्रलंबित आहे.
(३) विद्युत निरीक्षक, मिरज यांनी सदर प्रकरणाची चौकशी केली असून त्यांच्या अहवालानुसार सदर अपघात हा वर नमूद केल्यानुसार विद्युत कारणामुळे घडलेला आहे. सद्यस्थितीत दिनांक १२.०९.२०१८ रोजी ४ पैकी ३ नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी सदरच्या ऊस जळीत प्रकरणाची नुकसान भरपाई नको असल्याचे महावितरण कंपनीस कळविले आहे. तसेच चौथे शेतकरी श्री.संग्राम पाटील यांना आवश्यक कागदपत्रांची पुर्तता करण्याबाबत दिनांक १५.०९.२०१८ रोजी कळविले असून सर्व आवश्यक कागदपत्रांची पुर्तता झाल्यानंतर नुकसान भरपाई देण्याविषयी नियमोचित कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

पिंपरी (आंबा) (ता.जि.लातूर) येथे शॉट सर्किटमुळे झालेल्या नुकसानाची भरपाई अद्याप न मिळाल्याबाबत

(१८) १११९० (२३-०४-२०१८). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिंपरी (आंबा) (ता.जि.लातूर) येथे दिनांक १७ एप्रिल, २०१७ रोजी शॉट सर्किट होऊन कडबा, ट्रेलर व बैलगाडी जळाली असून सदरची नुकसान भरपाई मिळाली नसल्यामुळे सदर नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी सदर शेतकरी श्री.तुकाराम आदमने यांनी दिनांक २१ सप्टेंबर, २०१७ रोजी जिल्हाधिकारी, लातूर यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व सदर नुकसानग्रस्त शेतकऱ्यास नुकसानीची भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१३-०३-२०१९) : (१) हे खरे आहे.
(२) सदर विद्युत अपघाताबाबत विद्युत निरीक्षक, लातूर यांनी पाहणी व चौकशी केली आहे.
(३) विद्युत निरीक्षक, लातूर यांच्या अभिप्रायानुसार सदर जळीत अपघात हा जोराच्या वाऱ्यामुळे उपरी लघुदाब वाहिनीच्या तारांचा एकमेकांना स्पर्श होऊन ठिणग्या पडल्याने घडलेला आहे. सदर प्रकरणी रु.७२,९३३/- इतकी रक्कमेची नुकसान भरपाई महावितरण कंपनीमार्फत नुकसानग्रस्त शेतकऱ्यास धनादेशाद्वारे दिनांक १६.११.२०१८ रोजी अदा करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

महादुला-घोटी, ता. रामटेक येथे ११/३३ के.व्ही. चे वीज उपकेंद्र इन्फ्रा-२ अंतर्गत मंजूर सुरू करण्याबाबत

(१९) ११२१९५ (०४-०४-२०१८). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महादुला-घोटी (ता. रामटेक, जि. नागपूर) येथे ११/३३ के.व्ही. चे वीज उपकेंद्र इन्फ्रा-२ अंतर्गत मंजूर करण्यात आले आहे परंतू अजुनही काम सुरू करण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर काम कधीपासून सुरू करण्यात येणार आहे,
(३) तसेच सौरउर्जा कृषी फिडरचे केंद्र ५ ठिकाणी सुरू करण्याकरिता प्रस्ताव देण्यात आला असून तो केव्हा सुरू होणार आहे व त्यास किती अवधी लागेल,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१३-०३-२०१९) : (१) हे खरे नाही.
महादुला-घोटी, ता.रामटेक येथील प्रस्तावित ३३/११ के.व्ही.चे वीज उपकेंद्र इन्फ्रा-२ अंतर्गत मंजूर नसून पूर्व विदर्भ योजनेत मंजूर करण्यात आलेले आहे.
(२) ३३/११ के.व्ही.चे वीज उपकेंद्र उभारणीकरिता निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून कंत्राटदार यांना कामाचे कार्यादेश दि. ०२.०५.२०१८ रोजी देण्यात आले असून काम प्रगतीपथावर आहे.
(३) नागपूर जिल्ह्यात ४ सौर ऊर्जा प्रकल्प प्रस्तावित असून ही योजना महानिर्मिती मार्फत राबविण्यात येत आहे. कुही, तालुका भोजापूर येथील एका सौर कृषी वाहिनी प्रकल्पाकरिता लागणाऱ्या शासकीय जमिन ताब्यात घेऊन प्रकल्पाची अंमलबजावणी नियोजित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

कुंवारा भिवसेन (ता.पारशिवनी,जि.नागपूर) येथे पर्यटन विकासासाठी निधी मंजूर करण्याबाबत

(२०) ११२१९६ (०४-०४-२०१८). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुंवारा भिवसेन (ता.पारशिवनी, जि.नागपूर) येथे पर्यटन विकासाच्या दृष्टीने शासनाने रू.१३ कोटी मंजूर केले असून रू.२.५० कोटी निधी मिळाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उर्वरीत निधी १०.५० कोटी शासनाने कधी मंजूर करणार आहे,
(३) असल्यास, उर्वरीत निधी तात्काळ मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा (१३-०३-२०१९) : (१) अंशत: खरे आहे.

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २७५(१) अंतर्गत सन २०१४-१५ या वर्षाकरीता कुंवारा भिवसेन (ता.पारशिवनी, जि.नागपूर) येथे यात्री निवास बांधकाम करणे याकरीता राज्यशासनाने प्रस्तावित केलेल्या २.५० कोटी इतक्या निधीला केंद्र शासनाने मान्यता दिली आहे. सदर निधी दिनांक १७/३/२०१५ च्या शासन निर्णयान्वये वितरीत केला आहे. .
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

मालेगांव (जि.नाशिक) तालुक्यातील सब स्टेशनचे काम संथगतीने सुरु असल्याबाबत

(२१) ११४२८९ (१८-०४-२०१८). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालेगांव (जि.नाशिक) तालुक्यातील महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडळाच्या सायने शिवारातील वस्त्रोदयोग व्यावसायिकांसाठी असलेल्या सबस्टेशनचे काम संथगतीने सुरु असल्याचे दिनांक २८ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे येथील यंत्रमाग व्यावसायिकांना विजेअभावी अडचणींचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने या सबस्टेशनचे काम मार्च २०१८ अखरे तातडीने पूर्ण करुन येथील यंत्रमागधारकांना २४ तास वीज उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०५-०३-२०१९) : (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) ३३/११ के.व्ही.सायने टेक्सटाईल उपकेंद्राचे काम संथगतीने होत असल्याने त्यात सुधारणा करणेबाबत कंत्राटदारास कळविले होते. त्याअनुषंगाने सायने टेक्सटाईल उपकेंद्र दिनांक ०१.०८.२०१८ रोजी कार्यान्वित करण्यात आले आहे. सद्यस्थितीत सदर उपकेंद्रातून तीन ११

के.व्ही. वाहिन्या विद्युत भारीत करण्यात आलेल्या आहेत व विद्युतभार घेण्यात आला आहे. त्यामुळे या भागातील यंत्रामागे व्यावसायिकांनी आता योग्य दाबाने २४ तास वीजपुरवठा होत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

तुकाईवाडी (ता.खेड, जि.पुणे) येथे शॉर्ट सर्किट होऊन शेतातील ऊस जळून नष्ट झाल्याबाबत

(२२) ११५६६१ (१८-०४-२०१८). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तुकाईवाडी (ता.खेड, जि.पुणे) येथे विद्युत वाहिनीच्या तारा एकमेकांना चिकटल्याने शॉर्ट सर्किट होऊन लागलेल्या आगीत श्री.सुनील विठ्ठल सांडभोर या शेतकऱ्याचा शेतातील ऊस जळून नष्ट झाल्याची दिनांक १४ फेब्रुवारी, २०१८ रोजी घटना घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाच एकर क्षेत्रातील काढणीला आलेला ऊस जळाल्याने शेतकऱ्याचे जवळपास ६ लाख रुपयांचे नुकसान झाले असून याची तक्रार महावितरण, खेड यांचेकडे केली आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, तक्रारींच्या अनुषंगाने महावितरणच्या अधिकाऱ्यांनी नुकसानीची पाहणी केली आहे काय, त्यानुसार नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना महावितरणने किती आर्थिक मदत केली आहे वा करण्यात येत आहे व त्यानुषंगाने कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०५-०३-२०१९) : (१) हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

सदर शेतकऱ्याचा नुकसान भरपाई मिळणेबाबतचा अर्ज महावितरण कंपनीच्या राजगुरुनगर (खेड) विभागीय कार्यालयाकडे प्राप्त झाला आहे.

(३) महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांनी सदर घटना स्थळाची पाहणी केली आहे. विद्युत निरीक्षक, पुणे यांच्या अहवालानुसार नुकसान भरपाई देण्यासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व कागदपत्रांची पुर्तता करण्याविषयी संबंधित शेतकऱ्यास दिनांस २७.०९.२०१८ व ०६.१०.२०१८ रोजी पत्रान्वये कळविण्यात आले आहे. सदर कागदपत्रांची पुर्तता झाल्यानंतर नुकसान भरपाई देणेसंबंधीची पुढील नियमोचित कार्यवाही करण्याची तजवीज ठेवली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

श्रीरामपूर (जि.अहमदनगर) तालुक्यातील खोकर शिवारात ऊस जळून गेल्याबाबत

(२३) ११५८०२ (१८-०४-२०१८). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीरामपूर (जि.अहमदनगर) तालुक्यातील खोकर शिवारात शॉर्टसर्कीटमुळे ऊसाला लागलेल्या आगीत साडेचार एकर ऊस व ऊसाने भरलेला ट्रॅक्टर जळाला असल्याचे दिनांक २१ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या आगीत एका ३ वर्षाच्या बालिकेसह दोन ऊसतोडणी मजूर गंभीर भाजले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, येथे हाताच्या अंतरावर विजेच्या लोबंकळणा-या तारा असून या घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार जखमींना आर्थिक मदत वा भरपाई देण्याबाबत तसेच येथील लोंबकळणा-या वीजेच्या तारा दुरुस्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१३-०३-२०१९) : (१) हे खरे आहे. तथापि सदर आग शॉर्ट सर्किटमुळे लागली नसल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) अंशत: खरे आहे. सदर अपघातात फक्त एका ३ वर्षाच्या बालिकेस आगीमुळे भाजले आहे.
(३) सदर आगीची चौकशी विद्युत निरीक्षक, अहमदनगर कार्यालयामार्फत करण्यात आली आहे.सदर आग महावितरण कंपनीच्या वीज वाहिनीमुळे लागलेली नसल्याने नुकसान भरपाई देण्याचा प्रश्न उद्भवत नाही. तसेच मौजे खोकर गट क्र.४७ या घटनास्थळी विजेच्या लोंबकळणाऱ्या तारा आढळून आल्या नाहीत. त्यामुळे कार्यवाहीचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे शेंबा-कोथळी-वरंवड (जि.बुलडाणा) या रस्त्यावरील सहा विद्युत खांब रस्ता सुधारणा कामात अडथळा निर्माण करत असल्याने अपघातामध्ये वाढ झाल्याबाबत

(२४) ११९३२१ (२८-०७-२०१८). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे शेंबा-कोथळी-वरंवड (जि.बुलडाणा) या रस्त्यावरील कोथळी गावातील सहा विद्युत खांब रस्ता सुधारणा कामात अडथळा निर्माण करत असल्याने अपघातामध्ये वाढ झाल्याची बाब दिनांक १ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त रस्त्याच्या कामात अडथळा निर्माण करणारे विद्यूत खांब हटविणे बाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १४ मे, २०१८ रोजी कार्यकारी अभियंता महावितरण कंपनी, मलकापूर, जि.बुलडाणा यांना दिलेले निवेदन शासनास प्राप्त झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय निष्पन्न झाले, त्यानुसार सदरहू विद्यूत खांब हटविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१३-०३-२०१९) : (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.

स्थानिक लोकप्रतिनिधींचे दिनांक १४.०५.२०१८ रोजीचे निवेदन कार्यकारी अभियंता, मलकापूर विभाग येथे प्राप्त झाले आहे.

(३) मोताळा उपविभागाकडून शेंबा-कोथळी रस्त्यावरील एकूण ६ विद्युत खांब महावितरणमार्फत संचलन व सुव्यवस्था योजनेअंतर्गत जुलै, २०१८ मध्ये स्थलांतरीत करण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

घाटंजी (जि.यवतमाळ) तालुक्यात विविध ठिकाणी शेतातून वीज पुरवठा करणा-या वीजेच्या तारा लोंबळकत असल्याबाबत

(२५) ११९४९४ (२८-०७-२०१८). श्री.राजु तोडसाम (अर्णी) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घाटंजी (जि.यवतमाळ) तालुक्यात विविध ठिकाणी शेतातून वीज पुरवठा करणा-या वीजेच्या तारा लोंबळकत असल्याने उक्त वीजेच्या तारांमुळे या भागातील अनेक शेतक-यांचा मृत्यू झाला असल्याची बाब माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तक्रार करुनही विद्युत विभाग या लोंबकळत असलेल्या वीजेच्या तारा दुरुस्त करण्याबाबत कोणतीही कार्यवाही करत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार सदरहू विद्युत विभागाच्या हलगर्जीपणा करणा-या अधिका-यांविरुद्ध कारवाई करण्याबाबत व लोंबळकत असणा-या विद्युत तारा दुरुस्त करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१३-०३-२०१९) : (१) अमरावती परिमंडळाअंतर्गत यवतमाळ जिल्हयातील घाटंजी तालुक्याअंतर्गत मार्च व एप्रिल, २०१८ च्या दरम्यान वारा, वादळ व पावसामुळे वीज वाहीन्याचे नुकसान झाले होते. त्यामुळे घाटंजी परिसरात माहे एप्रिल, २०१८ मध्ये विजेच्या तारा लोंबकळत असल्याचे निदर्शनास आले होते. परंतु उक्त विजेच्या तारांमुळे कोणत्याही शेतकऱ्याचा शेत शिवारात विद्युत अपघात झालेला नाही.
(२) हे खरे नाही.
(३) माहे जानेवारी, २०१८ पासून विभागीय स्तरावरुन वीज वाहिनी देखभाल दुरुस्तीसाठी निविदांद्वारे कंत्राटदारांना वाहिनी दुरुस्ती कामे करण्याकरिता कार्यादेश देण्यात आले आहेत.

यवतमाळ विभागाअंतर्गत घाटंजी उपविभागात दुरुस्ती व देखभाल योजनेअंतर्गत, उच्चदाब व लघुदाब वाहिनीच्या ढिल्या व नादुरुस्त झालेल्या विद्युत तारा पुन्हा ओढणे, उच्चदाब व लघुदाब वाहिनीचे विद्युत पोल सरळ करणे, व नादुरुस्त पोल बदलणे इत्यादी कामे करण्यात आली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही

जळगाव शहरामध्ये विद्युत वाहिनी तसेच खांब जीर्ण झाले असल्याबाबत

(२६) ११९९६३ (२८-०७-२०१८). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव शहरामध्ये गेल्या ३० ते ३५ वर्षांपासूनची विद्युत वाहिनी तसेच खांब जीर्ण झाले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे काय,

(२) असल्यास, जीर्ण विद्युत वाहिनी तसेच खांब यांची शासनाने पाहणी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले,

(३) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१३-०३-२०१९) : (१) हे खरे आहे.

(२) जीर्ण विद्युत वाहिनी व खांबांची महावितरण कंपनीमार्फत पाहणी करण्यात आलेली आहे.

(३) जळगांव शहरातील जीर्ण विद्युत वाहिन्या व खांब बदलून विद्युत यंत्रणा बळकटीकरण करण्याकरीता एकात्मिक ऊर्जा विकास योजना अंतर्गत महावितरण कंपनीमार्फत कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

महाड (ता.महाड, जि.रायगड) औद्योगिक वसाहतीमधील सुस्थितीत नसलेल्या वीज व्यवस्थेमुळे कामगार व ग्रामस्थांच्या जीविताला निर्माण झालेला धोका

(२७) १२०२३२ (२८-०७-२०१८). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड (ता.महाड, जि.रायगड) औद्योगिक वसाहतीमधील सुस्थितीत नसलेल्या वीज व्यवस्थेमुळे कामगार व ग्रामस्थांच्या जीविताला धोका निर्माण झाल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त औद्योगिक वसाहतीमध्ये रस्ते आणि गटारालगत टाकण्यात आलेल्या वीज वाहक तारा, गंजलेले डीपींचे फ्युज बॉक्स, पथदिव्यांसाठी देण्यात आलेल्या जोडण्या आणि केबल्स असंरक्षित असल्यामुळे विजेचा धक्का बसून मोठया प्रमाणात वित्त व जिवीत हानी होण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार महाड औद्योगिक वसाहतीतील वीज व्यवस्था तातडीने सुस्थितीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१३-०३-२०१९) : (१) हे खरे आहे.

महाड (जि.रायगड) औद्योगिक वसाहतीमध्ये मोठया प्रमाणात रासायनिक प्रकल्प असल्यामुळे तेथील महावितरण कंपनीचे विद्युत खांब गंजून खराब होतात. परंतु माहे मे, २०१८ मध्ये वा त्यासुमारास याऔद्योगिक वसाहतीमध्ये कुठल्याही प्रकारचा वीज अपघात महावितरण कंपनीमुळे झालेला नाही.

(२) हे खरे नाही.

महावितरण कंपनीने औद्योगिक वसाहतीमधील मॅन्युफक्चरर्स असोसिएशन या संघटनेसोबत संयुक्त पाहणी केली. सदर पाहणीत आढळून आलेले धोकादाय डी.पी., खराब विद्युत खांब बदलण्यात व दुरुस्त करण्यात आले आहेत. तसेच पथदिव्यांसाठी देण्यात आलेल्या जोडण्या दुरुस्त केल्या आहेत. केबल्स असुरक्षित असलेल्या ठिकाणचे फिडर पिलर दुरुस्त करुन सुरक्षिततेच्या दृष्टीने कामे करण्यात आलेली आहेत.

(३) महावितरण कंपनीचे अधिकारी व महाड मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन यांच्या समवेत संयुक्त पाहणी करुन तसेच महाड औद्योगिक वसाहतीमध्ये अस्तित्वात असलेल्या वाहिन्यांचे मागील ३ वर्षाचे ब्रेकडाऊन व ट्रीपींगचा आढावा घेऊन वीज यंत्रणा सक्षम करणेसाठी आराखडा तयार करुन कामे हाती घेण्याचे नियोजित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

कर्जत (जि.रायगड) येथील चांधई गावांतील अनेक वीजेचे लोखंडी खांब गंजल्याबाबत

(२८) १२०८२७ (२८-०७-२०१८). श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत (जि.रायगड) येथील चांधई गावांतील अनेक वीजेचे लोखंडी खांब जीर्ण झाले असण्याच्या स्थितीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत महावितरण कार्यालय, कर्जत यांच्याकडे स्थानिक ग्रामस्थांनी तसेच लोकप्रतिनिधीनी गेल्या सहा महिन्यांपासून लेखी निवेदनाद्वारे सदर जीर्ण खांब बदलण्याकरीता मागणी केली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत अद्यापी कोणतीच कार्यवाही केली नसून शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१३-०३-२०१९) : (१) चांधई (जिल्हा रायगड) याअंतर्गत मोठी चांधई व छोटी चांधई गावातील ४१ लघुदाब वाहीन्यांच्या खांबापैकी ८ लघुदाब वाहीन्यांचे खांब जीर्ण झालेले आहेत.
(२) स्थानिक ग्रामस्थ व लोकप्रतिनिधीनी दिलेले दिनांक १८.०७.२०१८ रोजीचे महावितरणच्या क्षेत्रीय कार्यालयास निवेदन प्राप्त झाले आहे.
(३) चांधई गावातील जीर्ण झालेले खांब व त्यावरील वीजेच्या तारा डिसेंबर, २०१८ अखेर बदलण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

बोईसर (जि.पालघर) पूर्वेकडील ग्रामीण भागातील वीजपुरवठा वारंवार खंडीत होत असल्याने व्यावसायिकांचे होत असलेले नुकसान

(२९) १२३५९६ (२८-०७-२०१८). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बोईसर पूर्वेकडील (जि.पालघर) ग्रामीण भागातील वीजपुरवठा दिनांक १० एप्रिल, २०१८ पासून वारंवार खंडीत होत असल्यामुळे तेथील व्यावसायिकांचे नुकसान होत असल्याची बाब निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने यास जबाबदार असणाऱ्या वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली व वीजपुरवठा सुरळीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१३-०३-२०१९) : (१) हे खरे आहे.
(२) ११ के.व्ही.नागझरी वाहिनीवरुन सुरळीत वीज पुरवठा होत असला तरी दिनांक ११.०४.२०१८ ते दिनांक २७.०७.२०१८ या कालावधीत सदर वाहिनीचा अतिवृष्टीमुळे व इतर तांत्रिक कारणांमुळे सुमारे १५ वेळा विद्युत पुरवठा खंडित होण्याचा कालावधी एकूण १८ तास ३६ मि. एवढा होता.
(३) बोईसर पूर्वेकडील भागातील विद्युत पुरवठा यंत्रणा सक्षमीकरणासाठी, नवीन ३३/१ १ कि.व्ही उपकेंद्र (तारापुर टेक्स टाईल पार्क) कार्यान्वित करणे, १) पं.दिनदयाळ उपाध्याय ग्राम ज्योती योजनेअंतर्गत ११ के.व्ही नागझरी विद्युत वाहिनीच्या तारा (सुमारे ९ कि.मी.) बदलणे व त्याची क्षमता वाढवणे ही कामे हाती घेण्यात आली आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

फलटण (जि.सातारा) येथे वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसामुळे वीज पुरवठा खंडीत झाल्याबाबत

(३०) १२३७५७ (२८-०७-२०१८). श्री.दिपक चव्हाण (फलटण) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्हयात दिनांक २८ मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान झालेल्या वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसामुळे फलटण शहरात २४ तास वीज नसल्याने विजेअभावी सर्व व्यवहार बंद होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विजेअभावी बँकेने कामकाज बंद केल्याने फलटण शहरातील नागरिकांनी व ग्राहकांना विविध समस्यांना सामोरे जावे लागले असतानाही वीज विभागाकडून कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यांत येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१३-०३-२०१९) : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

दिनांक २७ मे, २०१८ रोजी रात्री १० च्या सुमारास झालेल्या प्रचंड वादळ वाऱ्यामुळे उच्चदाब वाहिनीचे १७ पोल तसेच लघुदाब वाहिनीचे ५२ पोल व दोन रोहित्र संच तुटून पडलेले होते. फलटण शहरामध्ये ज्या ठिकाणी उच्च व लघुदाब वाहिनीचे पोल पडलेले होते तो भाग सुरक्षिततेसाठी व कोणताही विद्युत अपघात घडू नये या कारणास्तव बंद करुन उर्वरित भागातील वीज पुरवठा दिनांक २८ मे, २०१८ रोजी सकाळी ७.३० वाजता पूर्ववत चालू करण्यात आला होता. बंद करण्यात आलेल्या भागातील उच्चदाब व लघुदाब वाहिनीचे पोल व तारा तसेच तुटून पडलेल्या २ रोहित्रांच्या दुरुस्तीची कामे दिनांक २८, २९, ३० व दिनांक ३१.०५.२०१८ या चार दिवसांमध्ये टप्प्या-टप्प्याने करुन विद्युत पुरवठा दिनांक ३१.०५.२०१८ रोजी पूर्णपणे सुरळीत करण्यात आला.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर जिल्हयात आठ हजार शेतीपंप विज जोडण्या निधी अभावी प्रलंबित असल्याबाबत

(३१) १२४६१० (२८-०७-२०१८). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने गेल्या तीन वर्षापासून निधीच उपलबध करुन दिला नसल्याने कोल्हापूर जिल्हयातील गडहिंग्लज विभागात १९१२, इचलकरंजी विभागात १४९, जयसिंगपूर विभागात १०७२, कोल्हापूर ग्रामीण विभाग एक मध्ये २५२३, ग्रामीण विभाग दोनमध्ये २७१७ तर कोल्हापूर शहर विभागात आठ अशा एकूण आठ हजार कृषीपंप वीज जोडणीपासून प्रलंबित असल्याचे माहे मे,२०१८ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले,
(३) तद्नुसार तात्काळ निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०५-०३-२०१९) : (१), (२) व (३) कोल्हापूर जिल्ह्याअंतर्गत सप्टेंबर, २०१८ अखेर एकूण ५४३० कृषीपंप पैसे भरुन प्रलंबित आहेत. राज्यात मार्च, २०१८ अखेर पैसे भरुन प्रलंबित राहणाऱ्या २,२४,७८५ कृषिपंप ग्राहकांकरिता उच्चदाब प्रणाली (HVDS) योजनेद्वारे वीज पुरवठा करण्यासाठी दिनांक ०५.०५.२०१८ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. सदर योजनेअंतर्गत कोल्हापूर जिल्ह्यातील १०४०२ कृषीपंप ग्राहकांना वीजजोडणी देण्याकरिता रु.२२८.३८ कोटी इतका निधी प्रस्तावित आहे. या योजनेअंतर्गत कोल्हापूर जिल्ह्याकरिता कार्यादेश देण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

औराद शहाजानी (ता.निलंगा, जि.लातूर) विद्युत उपकेंद्रात कनिष्ठ अभियंता नसल्याने झालेली गैरसोय

(३२) १२४६८५ (२८-०७-२०१८). श्री.बसवराज पाटील (औसा) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) निलंगा (जि.लातूर) तालुक्यातील औराद शहाजानी व हलगरा अशी दोन उपकेंद्रे असून औरादसह १६ गावे समाविष्ट असलेल्या वीज वितरण कार्यालय क्षेत्रात मागील वर्षभरापासून कनिष्ठ अभियंता पद प्रभारी असल्याची बाब दिनांक २३ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रभारी अधिकारी आठवड्यातून एखादा दिवस असणे, वादळी वाऱ्यात हलगरा, माकणी, तांबरवाडी, राजेवाडी, शिरसी आदी भागातील ९० विद्युत पोल मोडूनही महावितरणचे दुर्लक्ष होत असणे, वीज बील दुरुस्ती वा नवीन बिल भरण्यासाठी निलंग्याला जावे लागणे, खराब डीपी दुरुस्ती न होणे अशा अनेक समस्यांना संबंधीत वीज ग्राहकांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रभारी अभियंत्यांऐवजी कायमस्वरुपी कर्मचारी नेमणेबाबत व उक्त गैरसोयी दूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१३-०३-२०१९) : (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

माहे मे, २०१८ मध्ये वादळी वाऱ्यामुळे हलगरा, माकणी, तांबरवाडी, राजेवाडी, शिरसी आदी गावांमध्ये पोल पडले होते. या सर्व गावातील पडलेले पोल उभे करण्याचे काम त्वरीत हाती घेऊन तेथील विद्युत पुरवठा दोन दिवसांमध्ये सुरळीत करण्यात आलेला आहे.

औराद शहाजानी या ठिकाणी वीज बिल भरण्यासाठी पोस्ट व बँकेची सुविधा आहे. तसेच महावितरण कंपनीने नेमून दिलेले कंपनीचे कॅश कलेक्शन सेंटर सुध्दा आहे. वीज बिल दुरस्ती संबंधी निम्नस्तर लिपीक त्या ठिकाणी उपलब्ध असतो. खराब रोहित्रे वेळेत दुरुस्त करुन देण्यात येतात. त्यामुळे ग्राहकांची गैरसोय होत नाही. औराद शहाजानी शाखेतील सर्व नादुरुस्त रोहित्रे वेळेत बदलून दिली जातात. औराद शहाजानी शाखा कार्यालयांतर्गत नादुरुस्त झालेली रोहित्रे वेळेत बदलण्यात येतात.

(३) औराद शहाजानी येथील रिक्त अभियंत्याच्या जागेवर सहाय्यक अभियंत्याची पदस्थापना करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नांदेड जिल्ह्यातील जीर्ण झालेल्या विद्युत तारा व खांब बदलण्याचे काम तातडीने करण्याबाबत

(३३) १२४७८० (२८-०७-२०१८). श्री.सुभाष साबणे (देगलूर) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यात सन १९८० मध्ये वा त्या दरम्यान उभारण्यात आलेल्या विद्युत तारा व खांब सद्य:स्थितीत जीर्ण व धोकादायक अवस्थेत असून वारंवार तारा व खांब तुटल्याने जनावरे व नागरिक जखमी व मृत्यूमुखी पडल्याचा घटना घडत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने उक्त जिल्ह्याची पाहणी केली आहे काय, असल्यास, सदर पहाणीत काय आढळून आले आहे, तद्नुसार महावितरण कंपनीच्या जीर्ण झालेल्या विद्युत तारा व खांब बदलण्याचे काम तातडीने करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१३-०३-२०१९) : (१) विद्युत तारा व खांब हे नैसर्गिक आपत्तीमुळे तुटतात, त्यामुळे विद्युत अपघात घडतात.

(२) नांदेड जिल्ह्यात जीर्ण व धोकादायक असलेले पोल व तारा बदलण्याची कामे आय.पी.डी.एस (IPDS) योजनेअंतर्गत प्रगतीपथावर आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिके मध्ये भुमीगत विद्युत वाहिन्या चे काम जलद गतीने होण्याबाबत

(३४) १२६३४० (२९-०७-२०१८). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेमध्ये स्मार्ट सिटीच्या धर्तीवर भुमिगत विद्युत वाहिन्याचे काम जलद गतीने होण्याबाबत व नविन मंजूर नसलेल्या भुमिगत विद्युत वाहीन्या मंजुर करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास त्या मागणीसंदर्भात शासनाने कोणता निर्णय घेतला आहे व त्याचे स्वरूप काय आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१३-०३-२०१९) : (१) हे खरे आहे. उपरी वाहिन्या भुमिगत करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मागणी केली आहे.

(२) उपरी विद्युत वाहिन्यांचे रुपांतरण भूमिगत वाहिनीमध्ये करण्याकरिता लागणाऱ्या एकूण रु.२०८७.८ कोटी निधीचा प्रस्ताव केंद्र शासनास पाठविण्यात आला आहे. सदर प्रस्तावात कल्याण-डोंबिवली क्षेत्राकरिता लागणाऱ्या रु.६९८.३३ कोटी इतक्या निधीचा समावेश आहे. सदर निधी केंद्र शासनाकडून प्राप्त होताच उपरी विद्युत वाहिन्यांचे रुपांतरण भूमिगत वाहिन्यांमध्ये करण्याचे काम करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

वाडा व विक्रमगड (जि.पालघर) तालुक्यांमध्ये आदिवासींच्या विकासासाठी असलेल्या ठक्करबाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा योजनेच्या विकास कामांमध्ये झालेला गैरव्यवहार

(३५) १२६९३५ (२५-१०-२०१८). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.पास्कल धनारे (डहाणू), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.अमित घोडा (पालघर), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील वाडा व विक्रमगड तालुक्यांमध्ये आदिवासींच्या विकासासाठी असलेल्या ठक्करबाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा योजनेतील विकास कामांमध्ये कोट्यावधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाडा तालुक्यातील ७८ गावांसाठी सन २०१२ ते २०१५ दरम्यान ठक्करबाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजनेतील १९१ विकासकामांसाठी १५ कोटी ३ लाख रूपये मंजूर करण्यात आले मात्र सदर कामांत सुमारे १२ कोटींचा गैरव्यवहार झाल्याचे दिनांक ५ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) तसेच विक्रमगड तालुक्यात ठक्कर बाप्पा वस्ती सुधारणा योजनेतून सन २०१२ ते २०१५ या कालावधीत तालुक्यातील ९४ गावांपैकी ८३ गावांमध्ये ३०४ विकासकामे मंजूर करण्यात येऊन त्यासाठी ३० कोटी रुपयांचा निधी देण्यात आला मात्र यात गैरव्यवहार झाल्याचे सामाजिक कार्यकर्ते श्री.शरद पाटील यांनी माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आणले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी आयआयटीने केलेल्या चौकशी अहवालामध्ये ३०४ कामांपैकी एक काम प्रत्यक्ष सुरु झाले नाही, १०८ कामे प्रत्यक्षात स्थळावर मिळाली नाहीत, ५७ कामांची अंदाजपत्रकेच नाहीत, ९४ कामांचा दर्जा अत्यंत निकृष्ट दर्जाचा असल्याचे अहवालात नमूद करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या ३०४ कामांवर ३० कोटी रुपये खर्च झाला असला तरी प्रत्यक्षात १३ टक्केच कामे झाल्याने २६ कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे नमूद करुन प्रकल्प अधिकाऱ्यांनी या अहवालामध्ये एकच काम चार वेळा केल्याचे देखील निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, याप्रकरणी शासनाने वाडा व विक्रमगड तालुक्यासोबतच पालघर जिल्हयात या योजनेतंर्गत झालेल्या कामांची अधिक चौकशी केली आहे काय,

(७) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबधितांवर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा (१३-११-२०१८) : (१), (२) व (३) हे खरे नाही.

जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, पालघर यांनी त्यांच्या दि. २२/३/२०१६ रोजीच्या आदेशान्वये योजनांचे मुल्यमापन करण्यासाठी संस्थांची निवड केली आहे. त्यानुसार ठक्करबाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा विस्तारित कार्यक्रमाचे सन २०१२-१३ ते सन २०१४-१५ या कालावधीचे सामाजिक लेखापरिक्षण आयआयटी, पवई यांच्या कडून करण्यात येत आहे. सदर संस्थेस जव्हार, मोखाडा, विक्रमगड व वाडा या तालुक्यांतील कामे तपासणी साठी देण्यात आली होती. त्यापैकी संस्थेकडून प्रत्यक्षात विक्रमगड मधील ३०४ व वाडा मधील १९१ (एकूण ४९४) कामांचे सामाजिक अंकेक्षण करण्यात आले आहे.

वाडा तालुक्यातील सन २०१२ ते २०१५ दरम्यान ठक्करबाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजनेतील १९१ विकासकामांसाठी १४ कोटी ८९ लाख रूपये मंजूर करण्यात आले होते. तर विक्रमगड तालुक्यात ३०४ विकासकामांसाठी ३० कोटी ९६ लाख रूपये मंजूर करण्यात आले होते. सदर कामे कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जव्हार, कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, पालघर व कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, पालघर यांच्या मार्फत करण्यात आलेली आहेत.

(४) व (५) आयआयटी, पवई यांनी केलेल्या सामाजिक अंकेक्षणात ४९४ कामांपैकी ९३ कामे आढळून आलेली नाहीत, १११ कामांची अंदाजपत्रके प्राप्त न झाल्याने त्यांची तपासणी करता आलेली नाही. १५४ कामे कमी दर्जाची आढळून आलेली आहेत व ५८ काम अपूर्ण आहेत तर ४ कामे दोनदा दाखविण्यात आलेली आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

(७) याबाबत संबंधित यंत्रणांकडून लेखी खुलासा मागविण्यात आला असून सदर यंत्रणा दोषी असल्याचे आढळून आल्यास त्याबाबत कारवाई करण्यात येईल.

राज्यातील गोवारी समाजाचा अनुसूचित जमातीमध्ये समावेश करुन जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र देण्याबाबत

(३६) १२६९३९ (०५-१२-२०१८). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील गोवारी समाज हा आदिवासीच असल्याचा निर्णय मा.नागपूर हायकोर्ट खंडपीठाने दिनांक १४ ऑगस्ट, २०१८ रोजी दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने गोवारी समाजाचा अनुसूचित जमातीमध्ये समावेश करुन जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र देण्याबाबत शासनाने आदेश काढले आहेत काय,

(३)अद्याप तसे आदेश काढले नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत व आदेश केंव्हा काढण्यात येतील ?

श्री. विष्णु सवरा (२२-०२-२०१९) : (१) होय.

(२) व (३) केंद्र शासनाने "अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती आदेश (सुधारणा) अधिनियम, १९७६," अन्वये देशातील सर्व राज्यांच्या अनुसूचित जमातीच्या याद्या घोषित केल्या. त्यामध्ये महाराष्ट्र राज्याच्या अनुसूचित जमातीच्या यादीमध्ये अ.क्र. १८ येथे " Gond Gowari" असा उल्लेख आहे. भारतिय संविधानाच्या अनुच्छेद मधील तरतुदीनुसार अनुसूचित जाती/जमातीच्या यादीमध्ये सुधारणा करण्याचे किंवा त्यात नव्याने कोणत्याही जाती/जमातीचा समावेश करण्याचे अधिकार संसदेस आहेत.

गोवारी समाजाला अनुसुचित जमातीचे लाभ देण्याबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्यामधील गोवारी समाजाचा संशोधनात्मक अभ्यास (संशोधन/सर्वेक्षण) करण्याचे काम टाटा समाज विज्ञान संस्था, मुंबई या संस्थेस देण्यात आलेले असून सदर संस्थेकडुन संशोधनाचे काम सुरू आहे.

बेरड-रामोशी समाजाचा अनुसूचित जमातीमध्ये (एसटी) समावेश करण्याबाबत

(३७) १२७२५८ (०५-१२-२०१८). श्री.अनिल बाबर (खानापूर) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बेरड-रामोशी समाजाचा अनुसूचित जमातीमध्ये (एसटी) समावेश करावा या मागणीसाठी मिरज तालुक्यातील (जि.सांगली) बेरड समाजाच्या वतीने तहसिलदार कार्यालयावर दिनांक १९ ऑगस्ट, २०१८ रोजीच्या सुमारास मोर्चा काढून निवेदन देण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनात कोणत्या मागण्या करण्यात आल्या आहेत,

(३) असल्यास, या मागण्यांसदर्भात शासनाने निर्णय घेतला आहे काय, त्याचे स्वरुप काय आहे,

(४) अद्याप निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा (२२-०२-२०१९) : (१) होय.

(२) सदर निवेदनात बेरड-रामोशी समाजाचा समावेश अनुसूचित जमातीमध्ये करण्याची मागणी करण्यात आली आहे.

(३) केंद्र शासनाच्या दिनांक २६.०२.१९८१ च्या पत्रान्वये एखाद्या समाजाचा अनुसूचित जमातीच्या यादीत समावेश करण्यासाठी काही निकष निश्चित करण्यात आलेले आहेत. सदर निकष बेरड-रामोशी समाज पूर्ण करित नसल्याने सदर समाजाचा अनुसूचित जमातीच्या यादीत समावेश करण्यात आलेला नाही. तसेच सद्यस्थितीत महाराष्ट्र राज्याच्या विमुक्त जातीच्या यादीमध्ये बेरड-रामोशी समाजाचा समावेश आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

गगनबावडा (जि.कोल्हापूर) तालुक्यातील वीजेच्या खांबांची झालेली दूरवस्था

(३८) १२७३६६ (०६-१२-२०१८). श्री.अमल महाडीक (कोल्हापूर दक्षिण) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गगनबावडा (जि.कोल्हापूर) तालुक्यातील उभारण्यात आलेल्या विजेच्या खांबांना ४० ते ५० वर्षे झाली असल्याने त्यातील काही खांब हे गाजलेले व धोकादायक स्थितीत उभे असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बहुतांश गावातील कृषिपंप वाहिन्यांसाठीचे खांब चालू वर्षी झालेल्या पाऊस व वाऱ्याने पडले आहेत तर काही पडण्याच्या परिस्थितीत आहेत तरीही अद्याप खांब बदलण्याची कोणतीही प्रक्रिया पूर्ण न केल्याने स्थानिक लोकांमध्ये असंतोषाची भावना निर्माण झालीआहे , हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरचे धोकादायक खांब बदलण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१३-०३-२०१९) : (१) हे खरे आहे.
(२) चालू वर्षी झालेल्या पाऊस व वाऱ्याने पडलेले सर्व खांब दुरुस्त अथवा बदली करण्यात आले आहेत.
(३) सन २०१७-१८ मध्ये एकूण ५४ धोकादायक खांब बदलण्यात आलेले आहेत. सन २०१८-१९ मध्ये गंजलेले खांब दुरुस्त करण्याकरिता तसेच देखभाल व दुरुस्तीची कामे करण्याकरिता निविदा काढण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही

धनगर समाजास आरक्षण देण्याबाबतचा अहवाल टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेसने सादर केल्याबाबत

(३९) १२७३७६ (०६-१२-२०१८). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.गणपतराव देशमुख (सांगोले), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धनगर समाजास आरक्षण देण्याबाबतचा अहवाल टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेसने दिनांक २८ ऑगस्ट, २०१८ रोजी शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या अहवालातील शिफारशींचे थोडक्यात स्वरुप काय आहे,
(३) तसेच या मागणी करिता पैठण तालुक्यातील (जि.औरंगाबाद) बालानगर येथील परमेश्वर बबन घोंगडे या २२ वर्षीय तरुणाने स्वत:च्या शेतात गळफास घेवून आत्महत्या केली असल्याचे दिनांक ५ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, यामुळे विविध संघटनांनी परमेश्वर घोंगडेला शहीद घोषित करावे, त्याच्या लहान बहिणीला सरकारी नोकरी द्यावी, कुटूंबियांना आर्थिक मदत करावी व धनगर आरक्षणाची तात्काळ अंमलबजावणी करावी यासह विविध मागण्यांचे निवेदन शासनास दिले आहे, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, या निवेदनातील मागण्यांबाबत व टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेसने सादर केलेल्या अहवालावर शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा (०२-०४-२०१९) : (१) व (२) धनगर समाजाच्या अनुषंगाने टाटा समाजिक विज्ञान संस्था, मुंबई यांनी त्यांचा अहवाल ३१ ऑगस्ट, २०१८ रोजी शासनास सादर केला असून सदर अहवालातील शिफारशी शासनाच्या विचारार्थ आहेत.

(३) श्री परमेश्वर बबन घोंगडे यां तरुणाने दि. ३.८.२०१८ रोजी गळफास लावून आत्महत्या केली ही बाब खरी आहे.

(४) होय.

(५) टाटा सामाजिक विज्ञान संस्थेचा अहवाल शासनाच्या विचारार्थ सादर करण्यात आलेला आहे. तसेच निवेदनातील इतर मागण्या संबंधित विभागांकडे पुढील कार्यवाहीस्तव पाठविण्यात आलेल्या आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

मेहकर (जि.बुलढाणा) तालुक्यातील ग्रामीण भागामध्ये महावितरणची कामे निकृष्ट दर्जाची झालेली असल्याबाबत

(४०) १२८०१३ (०७-१२-२०१८). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुकळी (ता.मेहकर, जि.बुलढाणा) गावात माहे ऑगस्ट, २०१८ च्या दुस-या आठवडयापासून वीज पुरवठा खंडीत झाला असून या गावात तात्काळ रोहित्र उपलब्ध करुन द्या अन्यथा उपोषण करण्याचा इशारा मेहकर उपविभागीय कार्यकारी अभियंता यांना दिनांक २७ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच मेहकर तालुक्यातील (जि.बुलढाणा) ग्रामीण भागामध्ये महावितरणची कामे अत्यंत निकृष्ट दर्जाची झालेली असून शेतात असलेल्या खांबांना तारांऐवजी दो-या बांधून आधार देण्यात येत असल्याचे माहे जुलै, २०१८ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, महावितरणच्या बेजबाबदार कारभाराची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, प्रश्न भाग १ मधील निवेदनानुसार व प्रश्न भाग २ मधील नमूद कामे योग्य दर्जाची करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व केलेल्या कार्यवाहीचे स्वरुप काय आहे ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१३-०३-२०१९) : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) दिनांक २८.०८.२०१८ रोजी महावितरणच्या मेहकर उपविभागीय कार्यालयास प्राप्त झालेल्या निवेदनाची तात्काळ दखल घेत दिनांक २९.०८.२०१८ रोजी विद्युत रोहित्र बदलून वीज पुरवठा सुरळीत करण्यात आलेला आहे.

माहे जुलै, २०१८ या काळात मेहकर तालुक्यात वादळ वाऱ्यांमुळे महावितरणचे काही लोखंडी खांब झुकल्यामुळे तारा लोंबकळलेल्या होत्या, सदर झुकलेले खांब देखभाल दुरुस्ती अंतर्गत सरळ करण्यात आले असून लोंबकळलेल्या तारा ओढण्यात येऊन आवश्यक त्या ठिकाणी खांबांना ताण देण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

नाशिक जिल्ह्यातील विद्युत उपकेंद्रांमधून सिंगल फेज योजना सुरु करणे व नवीन उपकेंद्रांबाबत

(४१) १२८५३५ (०६-१२-२०१८). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला (जि.नाशिक) विधानसभा क्षेत्रातील विद्युत उपकेंद्रांमधून सिंगल फेज योजना सुरु करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १५ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास मुख्य अभियंता, महावितरण, नाशिक यांचेकडे केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कुसूर, अंगुलगांव व भरवसफाटा (जि.नाशिक) या ठिकाणी प्रस्तावित असलेल्या विद्युत उपकेंद्रांची कामे माहे ऑक्टोबर, २०१८ पर्यंत सुरु झालेली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१३-०३-२०१९) : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) येवला (जि.नाशिक) विधानसभा क्षेत्रातील ३३/११ के.व्ही.विखरणी, मुखेड व कोटमगाव या तीन उपकेंद्रातून निघणाऱ्या एकूण ९ शेतीपंप वाहिन्यांवर स्पेशल डिझाईन ट्रान्सफार्मर बसवून त्याद्वारे कृषीपंप वाहिनीवरील घरगुती ग्राहकांना भार नियमनाच्या काळात सिंगल फेज विद्युत पुरवठा करण्याची कामे मंजूर केली होती. त्यापैकी विखरणी उपकेंद्रातून निघणाऱ्या ४ वाहिन्यांचे काम पूर्ण होऊन त्या ठिकाणी स्पेशल डिझाईन ट्रान्सफार्मरने सिंगल फेज योजना कार्यान्वित करण्यात आलेली आहे. तसेच ३३/११ के.व्ही. मुखेड व कोटमगाव या उपकेंद्रातून निघणाऱ्या वाहिन्याची कामे प्रगतीपथावर आहेत.

येवला तालुक्यातील अंगुलगाव व कुसूर येथील उपकेंद्रांच्या प्रस्तावाची तांत्रिक पडताळणी (Technical Feseability) सुरु आहे. तसेच भरवस फाटा, ता.निफाड या परिसरातील ग्राहकांना योग्य दाबाने वीज पुरवठा मिळणे कामी, कानळद येथे १X५ एम.व्ही.ए. क्षमतेचे उपकेंद्र व देवगाव उपकेंद्रातील ५ एम.व्ही.ए.च्या रोहित्राची क्षमता वाढवून १० एम.व्ही.ए. करण्याची कामे मंजूर असून सदर कामांची निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

भोकर (जि.नांदेड) परिसरात वारंवार वीज पुरवठा खंडित होत असल्याबाबत

(४२) १२८६४० (०६-१२-२०१८). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोकर (जि.नांदेड) परिसरात महावितरण कंपनी विभागीय कार्यालयात सुमारे २ लाख रुपयांचा वीज देयक गैरव्यवहार करुनही येथे दररोज वीज खंडित होत असल्याने नागरिक त्रस्त झाले असल्याचे दि. ५ ऑगस्ट,२०१८ रोजी वा त्यासुमारास उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भोकरमध्ये महावितरणचे विभागीय कार्यालय असून येथून पाच तालुक्याचा कारभार चालविला जातो मात्र वरिष्ठ अधिका-यांचे नियंत्रणच नसल्याने येथील कर्मचारी बेजबाबदारपणे वागत असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी येथे नियमित वीज पुरवठा करण्याबाबत तसेच बेजबाबदारपणे काम करणा-या संबंधित कर्मचा-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१३-०३-२०१९) : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) भोकर परिसरात महावितरण कंपनीच्या विभागीय कार्यालयात वीज देयकाचा कोणताही गैरव्यवहार झालेला नाही. तसेच भोकर ते किनवट या राष्ट्रीय महामार्गाचे रुंदीकरणाचे काम प्रगतीपथावर असल्यामुळे सदर परिसरात वीज पुरवठा नियोजनपूर्ण पध्दतीने वेळोवेळी गरजेनुसार खंडित करुन काम करण्यात येत आहे. त्याबद्दलची माहिती महावितरण मोबाईल ॲपद्वारे वीज ग्राहकांना देण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुरूड नांदगाव येथील खारीकवाडा (ता.मुरूड, जि.रायगड) येथील वीज वाहक खांब गंजलेल्या स्थितीत असल्याबाबत

(४३) १२९०८१ (०६-१२-२०१८). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरूड नांदगाव येथील खारीकवाडा (ता.मुरूड, जि.रायगड) येथील श्री.पंढरीनाथ ठाकूर यांच्या घराजवळील वीजवाहक खांब गंजून खराब झाला असून अपघात होण्याची शक्यता असल्याने सदरहू खांब बदलण्यात यावेत म्हणून ग्रामस्थांनी दिनांक २८ जून, २०१७ रोजी वीजमंडळाच्या संबंधित अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रारी केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू तक्रारी करूनही एक वर्ष उलटले तरीही वीजवाहक खांब बदलण्यास होत असलेल्या दिरंगाईमुळे श्री.पंढरीनाथ ठाकूर यांनी उपोषण करण्याचा इशाराही महावितरण कंपनीला दिला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू गंजलेले धोकादायक खांबामुळे व या परिसरात वादळवारा व जोराचा पाउस पडत असल्याने शॉर्ट सर्कीट होवून मोठया प्रमाणात गावाला आगीमुळे नुकसान होण्याची शक्यता असतानाही गंजलेले खांब बदलण्यास विलंब होण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, सदरहू गंजलेले सर्व पोल विनाविलंब बदलण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१३-०३-२०१९) : (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) सदर खांब बदलण्याचे काम पं. दिन दयाळ उपाध्याय ग्राम ज्योती योजनेअंतर्गत प्रस्तावित केले असून गंजलेला वीज वाहक खांब सप्टेंबर २०१८ मध्ये बदलण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील विद्युत समस्यांबाबत

(४४) १२९२७२ (०५-१२-२०१८). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील विद्युत समस्यांबाबत शहापूर वीज वितरण कार्यालयात लेखी निवेदन देऊनही सुमारे १५ दिवसांनतरही कोणत्याही प्रकारची दखल न घेता समस्यांचे निराकरण न केल्याने वीज मंडळातील अधिका-यांना घेराव घालण्याचा इशारा दिनांक ऑक्टोबर, २०१८ रोजी तहसिलदार, शहापूर यांना दिला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१३-०३-२०१९) : (१) हे खरे आहे.
(२) शहापूर तालुक्यातील विद्युत समस्येबाबत दिनांक ०३.१०.२०१८ रोजी समन्वय बैठक होऊन त्यामध्ये महावितरणद्वारा झालेल्या कामांचा आढावा सदर मोर्चेकरी यांना अवगत करण्यात आला. यात पायाभूत सुविधा-२ या योजनेअंतर्गत शहापूर उपविभागामध्ये २२/३३ के.व्ही स्विचिंग स्टेशनची नवीन तीन कामे प्रगतीपथावर आहेत. शहापूर उपविभागात ११७३ सिंगल फेज फॉल्टी मिटर बदलणे व शहापूर उपविभागातील वीज ग्राहकांची वीज बिले वेळेवर न देणाऱ्या एजन्सीवर दंडात्मक कार्यवाही करुन वीज बिले वेळेत वाटण्याची सक्त ताकीद

देण्याची कार्यवाही करण्यात आली आहे. तसेच वेगवेगळया योजनेअंतर्गत मागील दोन वर्षात लघुदाब वाहिनीचे व उच्चदाब वाहिनीचे पोल बदलणे तसेच पं. दिनदयाळ उपाध्याय ग्राम ज्योती योजनेअंतर्गत ५ नवीन रोहित्रे बसविण्यात आली आहेत. याशिवाय शहापूर उपविभागात डिपीडीसी योजनेअंतर्गत उच्चदाब/लघुदाब वाहिनीच्या तारा बदली करणे, नवीन रोहित्र बसविणे, रोहित्रांची क्षमता वाढविणे आणि लघुदाब वाहिनीचा विस्तार करणे, उच्चदाब/लघुदाब वाहिनीचे सक्षमीकरण करणे इ.कामे नियोजित आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

शिवणी रसुलापूर (जि.अमरावती) येथील वीजेच्या मीटरमधील त्रुटी, चुकीचे रिडिंग व वीज चोरी इत्यादी प्रकारांमुळे नागरिक त्रस्त झाले असल्याबाबत

(४५) १२९९३५ (०६-१२-२०१८) प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.नसीम खान (चांदिवली), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :
सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील शिवणी रसुलापूर येथील वीजेच्या मीटरमधील त्रुटी, चुकीचे वाचन व वीज चोरी इत्यादी प्रकारांमुळे सामान्य जनतेला त्रास सहन करावा लागत असून याकडे स्थानिक प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले. त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१३-०३-२०१९) : (१) अंशत: खरे आहे.

माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वीज ग्राहकांच्या तक्रारी महावितरण कंपनीच्या कार्यालयास प्राप्त झाल्या होत्या. दिनांक २० व २१ ऑगस्ट, २०१८ रोजी वीज चोरी शोध मोहीम घेण्यात आली होती. त्यात वीज चोरी आढळली नाही. मीटर वाचनातील त्रुटी, फॉल्टी मीटरच्या तक्रारींचे महावितरणतर्फे निराकरण करण्यात आलेले आहे.

(२) सदर प्रकरणाची स्थानिक कार्यालयामार्फत चौकशी करण्यात आली व त्यामध्ये संबंधित एजन्सीच्या मीटर वाचनाच्या कामामध्ये त्रुटी आढळून आल्याने त्यांचे काम बंद करण्यात आलेले असून सुरक्षा ठेव रक्कम सदरील एजन्सीला अदा करण्यात आलेली नाही. तसेच ३२ फॉल्टी मीटर बदलण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

घनसावंगी (जि.जालना) तालुक्यातील कुंभार पिंपळगाव परिसरातील ३७ गावांसाठी फक्त ६ लाईनमन असल्याबाबत

(४६) १३०५६६ (०६-१२-२०१८). श्री.संतोष दानवे (भोकरदन) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घनसावंगी (जि.जालना) तालुक्यातील कुंभार पिंपळगाव परिसरातील ३७ गावांसाठी फक्त ६ लाईनमन असल्याने वसुलीसह वेळेत सुविधा मिळण्यास नागरिकांना अडचणी येत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू भागात लाईनमन व वसुली अधिकारी वाढवून नागरिकांना योग्य सुविधा पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०५-०३-२०१९) : (१) व (२) कुंभारपिंपळगाव, शाखेअंतर्गत तांत्रिक कर्मचाऱ्यांची ११ पदे मंजूर असून त्यापैकी ०८ पदे रिक्त असून सदर रिक्त पदी ०७ बाह्यस्त्रोत कर्मचाऱ्यांची नियुक्ती माहे मार्च, २०१८ पासून करण्यात आली आहे. तांत्रिक कर्मचाऱ्याचे केवळ ०१ पद रिक्त आहे. तसेच सहाय्यक अभियंता यांच्या रिक्त असलेल्या पदाचा अतिरिक्त कार्यभार कनिष्ठ अभियंता, घनसावंगी यांना सोपविण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

करमाळा तालुक्यातील (जि.सोलापूर) मौजे ढोकरी येथे ३३/११ केव्हीएचे नवीन विद्युत उपकेंद्र मंजूर करण्याबाबत

(४७) १३०९११ (०६-१२-२०१८). श्री.नारायण पाटील (करमाळा) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करमाळा (जि.सोलापूर) तालुक्यातील मौजे ढोकरी येथे ३३/११ केव्हीएचे नवीन विद्युत उपकेंद्र मंजूर करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ३ ऑक्टोबर, २०१८ रोजी व तद्नंतर अनेक वेळा मा.उर्जामंत्री यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ढोकरी व तालुक्यातील अनेक गावांना कमी दाबाने वीज पुरवठा होत असल्याने ३३/११ केव्हीएचे नवीन विद्युत केंद्र करण्याच्या मागणीबाबत निर्णय घेण्यात आला आहे काय वा त्यानुषंगाने सुरु असलेल्या कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,

(३) अद्याप निर्णय घेण्यात आला नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१३-०३-२०१९) : (१) हे खरे आहे.

(२) करमाळा तालुक्यातील गावांना योग्य दाबाने वीज पुरवठा करण्यासाठी पायाभूत सुविधा आराखड्यांतर्गत ७ नवीन उपकेंद्रे कार्यान्वित करण्यात आली असून, १ उपकेंद्राचे काम प्रगतीपथावर आहे. याव्यतिरिक्त ४ उपकेंद्रामध्ये ५ एम.व्ही.ए. क्षमतेचे अतिरिक्त पॉवर

ट्रान्सफार्मर उभारण्यात आले आहेत. मौजे ढोकरी परिसरास सद्यस्थितीत ३३/११ के.व्ही वांगी-१ उपकेंद्रामधून वीज पुरवठा होत आहे. तथापि या उपकेंद्रावरील सध्याचा भार व भविष्यातील कृषीपंपाची मागणी लक्षात घेता, मौजे ढोकरी येथे उपकेंद्र उभारणे विचाराधीन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

मंगळवेढा व पंढरपूर (जि.सोलापूर) येथील शेतीपंपाच्या वीज पुरवठ्यात अचानक कपात केल्याबाबत

(४८) १३१२३६ (०६-१२-२०१८). श्री.भारत भालके (पंढरपूर) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मंगळवेढा व पंढरपूर (जि.सोलापूर) येथील शेती पंपाच्या वीज पुरवठ्यात अचानक कपात केल्यामुळे शेती पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असल्यामुळे विविध संघटनांनी पंढरपूर येथील वीज वितरण कंपनीच्या कार्यालयासमोर दि.९.१०.२०१८ रोजी वा त्या दरम्यान ठिय्या आंदोलन केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना त्यांच्या शेती पंपांना दिवसा सलग ८ तास वीज पुरवठा करण्यात यावा अशी प्रमुख मागणी आंदोलकांच्या वतीने करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले असून उपरोक्त आंदोलनादरम्यान आंदोलकांना कार्यकारी अभियंता, वीज वितरण कंपनी यांनी वीज पुरवठा सुरळीत करून शेती पंपासाठी १० तास वीज उपलब्ध करून देणार असल्याचे लेखी आश्वासन दिले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास शेतकऱ्यांना शेतीसाठी वीज पुरवठा तातडीने सुरळीत होणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१३-०३-२०१९) : (१) दि. ०९/१०/२००९ रोजी महावितरणच्या पंढरपूर विभागीय कार्यालयासमोर शेतीपंपाना १० तास वीज पुरवठा करण्यासाठी ठिय्या आंदोलन करण्यात आले होते.
(२) वीजेचे मागणी व वीजेची उपलब्धतता यातील तफावत दूर होऊन स्थिती सुधारल्यांनतर शेतीपंपांना दिवसा ८ तास किंवा रात्री १० तास वीज पुरवठा करण्यात येईल असे लेखी आश्वासन कार्यकारी अभियंता, पंढरपूर यांनी आंदोलनकर्त्यांना दि. ०९.१०.२०१८ रोजी दिले होते.
(३) कोळशाअभावी वीजेची उपलब्धता कमी झाल्याकारणाने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार राज्यातील कृषी वाहिन्यांवर दिनांक १०/१०/२१८ ते दिनांक ३१/१२/२०१८ या कालावधीमध्ये रात्री ८ तास किंवा दिवसा ८ तास असा थ्री फेज वीज पुरवठा चक्राकार पध्दतीने करण्यात आला होता. सद्यस्थितीत मागणी एवढी विजेची उपलब्धतता असल्याने दिनांक ०१/०१/२०१९ पासून राज्यात कृषी वाहिन्यांवर रात्री १० तास किंवा दिवसा ८ तास चक्राकार पध्दतीने थ्री फेज वीज पुरवठा करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

बुलडाणा जिल्हा आदिवासी कोळी महादेव संघर्ष समितीच्या वतीने त्यांच्या विविध मागण्यासंदर्भात कार्यवाही होणेबाबत

(४९) १३३८३४ (०६-१२-२०१८). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.भारत भालके (पंढरपूर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलडाणा येथील आदिवासी कोळी महादेव संघर्ष समितीने व स्थानिक लोकप्रतिनिधींनी कोळी महादेव समाजाच्या विविध मागण्यांवर कार्यवाही होणेबाबत जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा यांच्याकडे दिनांक १५ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी त्यांच्या मागण्यांबाबत कार्यवाही केली नाही तर आदिवासी कोळी महादेव समाजाने लोकशाही मार्गाने अन्नत्याग व उपोषणाचा इशाराही दिला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा (२२-०२-२०१९) : (१) व (२) होय.

(३) महाराष्ट्र अनुसूचित जाती, महाराष्ट्र अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग जातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम २००० व त्याअंतर्गत करण्यात आलेले नियम २००३ मधील तरतूदी नुसार अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही करण्यात येते. अधिनियमाच्या कलम ८ नुसार दावा सिध्द करण्याची जाबाबदारी ही अर्जदारावर आहे. अनुसूचित जाती/जामतीचे प्रमाणपत्र प्राप्त करण्यात येत असलेल्या अडचणींचा अभ्यास करुन त्यावर उपाययोजना सूचविण्यासाठी दि. १४ जानेवारी, २०१९ च्या शासन निर्णयान्वये मा. उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील लॉन्ड्री व्यवसायिकांना सौर ऊर्जा प्रकल्पासाठी
२५ टक्के सवलत देण्याच्या निर्णयाबाबत

(५०) १३४०५८ (०७-१२-२०१८). श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील लॉन्ड्री व्यवसाय करणाऱ्या तरुणांना २५ टक्के सवलत देण्याचा निर्णय मा.ऊर्जा मंत्री यांनी दिनांक २४ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास घेतला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेचे स्वरूप काय आहे,

(३) असल्यास, सदर पूर्ण योजना करण्यासाठी येणारा खर्च किती आहे व राज्यातील किती व्यवसायिकांना याचा फायदा होणार आहे,

(४) असल्यास, उक्त योजना राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१३-०३-२०१९) : (१), (२), (३), (४) व (५) महाऊर्जाच्या नियामक मंडळाने राज्यातील १ ते २० किलो वॅट क्षमतेवर कार्यान्वित असलेल्या लघु उदयोगांना त्यांचा व्यवसाय सौर ऊर्जेवर आणण्यासाठी अर्थसहाय्य म्हणून २५ टक्के हिस्सा महाऊर्जाच्या स्वनिधीतून देण्याचा निर्णय घेतला आहे.

यात धोबी परीट समाज यांचे लॉन्ड्री व्यवसाय/मत्स्य व्यवसाय/पशुसंवर्धनावर आधारीत व्यवसाय/महिला बचत गटांमार्फत राबविण्यात येणारे लघु उदयोग/पिठाच्या गिरण्या यांचा समावेश असेल.

यासाठी प्रथमत: रू.५ कोटी ची तरतुद महाऊर्जाच्या स्वनिधीतुन उपलब्ध करण्यासाठी महाऊर्जाच्या नियामक मंडळाने मान्यता दिली आहे.

योजनेचे स्वरूप व अंमलबजावणीची कार्यपध्दती तयार करण्याचे काम महाऊर्जाकडून करण्यात येत आहे.

विधान भवन :
मुंबई.

जितेंद्र भोळे
सचिव (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा.

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.